दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक सागर राणा अभोरे संपादक बद्रूभाऊ इगोले

RNI No - MHMUL/25/A0788

वाशीम ■ शनिवार दि. ३० ऑगस्ट २०२५ ■ वर्ष : २ रे ■ अंक : ११५ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रुपये ■ Title code:- MAHMUL039353


# विरोधी पक्षांसह सत्ताधारी आमदार

## खासदार ‘मैदाना’त, उपोषणावर बसलेले मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत दिला पाठिंबा

मुंबई : आझाद मैदानात उपोषणास बसलेल्या मराठा मोर्चाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची विरोधी व सत्ताधारी पक्षाच्या आमदार, खासदारांनी भेट घेऊन पाठिंबा दिला. सत्ताधारी पक्षाचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार व माजी मंत्री प्रकाश सोळंके यांनी सरकारने आता ठाम भूमिका घेण्याची वेळ आली आहे. कोर्टकचेरीच्या भानगडीत न अडकता डिसिझन लेने का तो अभी लेने का, अशी प्रतिक्रिया दिली. तर गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी सरकारचा दुवा म्हणून इथे आलो असून स्वतः सरकारशी बोलेन, असे सांगितले.

मनोज जरांगे पाटील यांची आझाद मैदानात उद्धवसेनेचे खा. संजय बंडू जाधत (परभणी), खा. ओमराजे निंबाळकर (धाराशिव), आ. कैलास पाटील (धाराशिव), राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खा. बजरंग सोनवणे (बीड), खा. भास्कर भगरे (दिंडोरी), खा. निलेश लंके (अहमदनगर), आ. संदीप क्षीरसागर (बीड), आ. अभिजित पाटील (माळा), राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राजू नवघरे (वसमत) यांच्यासह शिवसंग्राम संघटनेच्या ज्योती मेटे व करुणा मुंडे यांनी भेट घेत त्यांच्या आंदोलनास पाठिंबा दिला.

मनोज जरांगे पाटील यांना मुंबईत बोलावून तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी आश्वासन देऊन गुलाल उधळायला लावला होता. त्यावेळी जो शब्द दिला होता तो विचार करून दिला होता का, की अविचाराने दिला होता? वेळ मारून नेण्यासाठी दिला होता का? ज्यांनी शब्द दिला त्यांनी त्याची पूर्तता करायला हवी. ती फसवणूक आहे की नाही? त्यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला होता त्याचे पालन करायलाच हवे, अशी टीका उद्धवसेनेचे खा. ओमराजे निंबाळकर यांनी केली.

समाजाचा विषय असल्याने मराठा म्हणून आंदोलनास आलो आहे. आता सुरवात झाली आहे. आगे, आगे देखो होता हैं क्या? लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन करून मागण्या मांडणे हा आमचा अधिकार आहे. सत्तेत असणाऱ्यांनी विरोधकांकडे बोट दाखवू नये. आम्ही सत्तेत असतो तर आमची बांधिलकी असती.

**- खा. संजय बंडू जाधव**

मुंबईत २ टक्केही लोक आली नाहीत. काही लोक अजूनही बाहेरच आहेत. सरकारची भूमिका सांगता येत नसली तरी त्यांच्या मागण्यांचा विचार करावा. ओबीसीमधून आरक्षण मिळावे याला पाठिंबा आहे. आंदोलनाची पुढील जी दिशा असेल त्याप्रमाणे सहभागी होऊ.

**- खा. बजरंग सोनवणे**

मुंबईने गर्दीचा विश्वविक्रम मोडला आहे. अनेक वर्षांपासूनच्या लढ्याला यश मिळाले पाहिजे. सरकारने आता निर्णय घेतला पाहिजे. किती दिवस ताटकळत ठेवणार आहे. एक घाव दोन तुकडे केले पाहिजे. किती दिवस घोंगडे भिजत ठेवणार आहे? दुर्जनांना बुद्धी द्यावी आणि आंदोलनाला यश देवो, अशी गणरायाला प्रार्थना करतो.

**- खा. नीलेश लंके**




# धर्मग्रंथ वाचणारे कधीच दंगली करत नाहीत. - कवी अनंत राऊत

महाराष्ट्र जीत

**राजापूर:-**
ओणी पंचक्रोशी शिक्षण मंडळ, ओणी आयोजित प्रबोधनकार ठाकरे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा 2025 या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नूतन विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, ओणीच्या गुरुवर्य शहाजी भाऊराव खानविलकर सभागृहात संपन्न झाला. स्पर्धेचे हे विसावे वर्ष होते. स्पर्धेमध्ये नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे, कोल्हापूर, रत्नागिरी या ठिकाणांहून 23 स्पर्धक सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवन व स्वागत गीताने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष वासुदेव तुळसणकर होते. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून प्रसिद्ध कवी मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा फेम अनंत राऊत उपस्थित होते. व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीत संस्थेचे कार्याध्यक्ष प्रदीप संसारे, उपाध्यक्ष अरविंद गोसावी, कार्यवाह ॲड. गुरुदत्त खानविलकर, महादेव धुरे, चंद्रकांत बावकर, नारायण




शेलार, गणपत जानस्कर, परिक्षक रवींद्र खैरे, रवींद्र राऊत, प्रशांत गुरव, नामदेव तुळसणकर, विवेक सावंत, शाळा समिती अध्यक्ष विजयकुमार वागळे, सौ. प्रज्ञा तुळसणकर, डॉ. शैलेश शिंदेदेसाई, ॲड. एकनाथ मोंडे, गणेश गांधी, मुख्याध्यापक विनोद मिरगुले व अन्य मान्यवर उपस्थित होते. व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांचे स्वागत ॲड. गुरुदत्त खानविलकर यांनी गुलाबपुष्प देऊन केले. प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख करून देताना मुख्याध्यापक विनोद मिरगुले म्हणाले, अनंत राऊत हे महाराष्ट्रातील तरुणांमध्ये घोंघावणारे विचारांचे वादळ आहे. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते अनंत राऊत यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. व्यासपीठावर आपले विचार व्यक्त करताना परीक्षक रवींद्र खैरे म्हणाले, अनंत राऊत हे शब्दांचे जादूगार आहेत. ओणीची स्पर्धा ही माणूस घडविणारी कार्यशाळा आहे असे स्पर्धेबद्दल उद्‌गार खैरे यांनी काढले. प्रबोधनकारांच्या कार्याची थोरवी सांगावी तेवढी कमीच आहे. कृतीतून प्रबोधन करणारे म्हणजेच प्रबोधनकार. असे अध्यक्षीय मनोगतात वासुदेव तुळसणकरांनी उद्‌गार काढले. मस्तकात जर पुस्तके भरलेली असतील तर कोणीही आपल्याला अविचारांची टोपी घालू शकत नाही. जे वितळून जाईल ते फेकून दिले पाहिजे, जे उजळून निघेल त्याचा स्वीकार केला पाहिजे. आपापले धर्मग्रंथ वाचणारे कधीच दंगली करत नाहीत. क्षमा ज्ञानी माणसाचे सर्वांत जवळचे लक्षण आहे. असे प्रतिपादन प्रमुख वक्ते कवी अनंत राऊत यांनी केले. कवी अनंत राऊत यांनी श्रोत्यांसमोर मैत्री, प्रेम, राजकारण, समाजसेवा, भक्ती अशा विविध विषयांवर कविता सादर केल्या. श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना भरभरून प्रतिसाद दिला. यानंतर प्रबोधनकार ठाकरे युवा वक्ता पुरस्काराचे मानकरी घोषित करण्यात आले. प्रबोधनकार ठाकरे युवा वक्ता पुरस्कार 2025 चे विजेते -1) अनिकेत रामा वनारे - संताजी महाविद्यालय, नागपूर 2) अनुष्का यशवंत बिराजदार - सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे 3) प्रथमेश राहुल चव्हाण - बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे उपविजेते - 1) सानिया उदय यादव,कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, लांजा
2) बिल्वा गणेश रानडे - फाटक हायस्कूल, रत्नागिरी 3) आदित्य ज्ञानेश्वर दराडे माणिकचंद पहाडे लॉ कॉलेज, छत्रपती संभाजीनगर
विजेत्यांना रोख रक्कम रु. 7500/- सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन तर उपविजेत्यांना रोख रक्कम रु. 2000/- व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिया तुळसणकर यांनी तर आभार प्रसाद मयेकर यांनी मानले.

## श्री छत्रपती हायस्कूल सणसर मधील विध्यार्थ्यांनी बनवले इको फ्रेंडली गणपती

महाराष्ट्र जीत

**सणसर :**
श्री छत्रपती हायस्कूल सणसर या विद्यालयातील जवळजवळ 90 विद्यार्थ्यांनी माती पासून इको फ्रेंडली गणपती बनवून पर्यावरण पूरक उपक्रम अतिशय आनंदी वातावरण मध्ये राबविला.या सर्व विद्यार्थ्यांना इको फ्रेंडली गणपती बनवण्याची संकल्पना विद्यालयाचे कलाशिक्षक श्री.परशुराम घाडगे सर व श्री.विकासभाऊ फुले यांनी दिली.विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांकडून माती पासून गणपती बनवून घेतले. विद्यार्थ्यांनी अतिशय सुबक आणि सुंदर अशा गणपतीच्या मूर्ती तयार केल्या असून तयार केलेल्या सर्व गणपतीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात
आली.विसर्जन करते वेळेस सर्व गणपती विद्यालया च्या समोरच्या बाजूस कृत्रिम हौदामध्ये विसर्जित केल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजातील लोकांना पर्यावरण वाचवा हा संदेश निश्चितच दिला आहे.विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.चव्हाण यु.बी सर भोसले डी आर घाडगे सर यादव सर सर्व शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना याकामी मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांनी अतिशय आनंदी वातावरणामध्ये भक्तिभावाने गणेश मूर्ती तयार केल्या.यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद द्विगुणीत झाला होता.यावेळी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन विद्यालयाच्या वतीने करण्यात आले




# बोगस कीटकनाशकांसह खतांची विक्री ओझर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल..

महाराष्ट्र जीत

**- कृष्णा गायकवाड पिंपळगाव बसवंत**
विनापरवाना बोगस कीटकनाशकांसह खतांची विक्री याबाबत जिल्ह्यात विनापरवाना व आयुर्वेद कीटकनाशकांची विक्री करणारी टोळी सक्रिय असून छुप्या पद्धतीने ते शेतकऱ्यांना विविध आमिष दाखवून त्यांची विक्री करतात. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ओझर टाऊनशिप येथील मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या श्री खंडेराव मंदिराजवळ ऐवैध्य विनापरवाना कीटकनाशके व जैव उत्तेजक विक्री होत असल्याची गुप्त माहिती जिल्हा कृषी अधिकारी यांना मिळाल्यानंतर त्यांच्या भरारी पथकाने अचानक धाड टाकून एक लाख 69 हजार 904 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ओझर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय कार्यालयाला आयुर्वेद विनापरवाना कीटकनाशके व जैव उत्तेजक जिल्ह्यात



विक्री होत असल्याची खबर प्राप्त झाली होती त्यानुसार जिल्हा भरारी पथकाने. विभागीय कृषी संचालक सुभाष काटकर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, कृषी विकास अधिकारी संजय शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक डॉ. जगन सूर्यवंशी कृषी अधिकारी गुण नियंत्रण राहुल धनगर (निफाड) यांनी भरारी पथकाच्या मदतीने ही कारवाई केली . प्रमुख संजय शेवाळे कृषी विकास अधिकारी सदस्य डॉ. जगन सूर्यवंशी जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरक्षक तसेच गुणवत्ता नियंत्रण निरक्षक राहुल धनगर यांनी बनावट ग्राहक पाठवून कीटकनाशके व जैव उत्तेजकाची संशयित गोविंद भामरे यांच्याकडे भ्रमणध्वनी द्वारे मालाची मागणी केली त्याप्रमाणे संशीयता ने ओझर येथील खंडेराव मंदिराजवळ माल घेऊन येणार असल्याचे सांगितले त्यानुसार संशयित अगोदरच मालासह उपस्थित होता यावेळी डॉ. जगन सूर्यवंशी व राहुल धनगर यांनी बिलाची व परवानाची मागणी केली असता भांबरे यांनी कुठल्याही प्रकारचे बिल व परवाना सादर केले नाही माला बद्दल संशय बळावल्याने संशयीताला ओझर पोलीस ठाणे येथे घेऊन जात मालाची पंच समक्ष शहानिशा करण्यात आली यावेळी बायर क्रॉप सायन्स चे लूना व नेटओ, तर सिजेंटा कंपनीचे स्कोर हे बुरशीनाशक सिजेंटा कंपनीचेच इसा बीरॉन व पेन्सिबाओ प्रायव्हेट वांग प्रा. लिमिटेड चे बायो आर हे जैव उत्तेजक आढळली कीटकनाशक व बायोस्टीमुलट असा एकूण एक लाख 69 हजार 904 रुपयांचा मुद्देमाल आढळून आला कीटकनाशक व बायोस्टी मुलंट पोलीस स्टेशनमध्ये जमा करून त्यातून कीटकनाशके कायदा तरतुदीनुसार कीटकनाशकांचे नमुने काढण्यात आले असून तिघांवर ओझर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## मायाक्का मंदिर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उद्यानातील सार्वजनिक शौचालयाची दुरावस्थेबाबत शिवसेना ( उबाठा ) पक्ष आक्रमक

महाराष्ट्र जीत

**पनवेल ( वार्ताहर )**
कामोठे वसाहतीतील सेक्टर 35 येथील मायाक्का मंदिर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उद्यानातील सार्वजनिक शौचालयाच्या दुरावस्थेबाबत शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्ष आक्रमक झाला असून तातडीने पनवेल महानगरपालिकेने आवश्यक सुधारणा कराव्यात अशी मागणी शिवसेने कडून करण्यात आली आहे . या संदर्भात शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे कामोठे उपशहर प्रमुख सचिन मनोहर त्रिमुखे यांनी पनवेल महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी यांची भेट घेऊन प्रभागातील सेक्टर 35 येथील मायाक्का मंदिर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उद्यान परिसरात असलेले सार्वजनिक शौचालय सध्या अत्यंत खराब स्थितीत आहे. शौचालयाच्या बांधकामाची तोडफोड झालेली असून ते विद्रूप अवस्थेत आहे.पाणीपुरवठ्याची योग्य व्यवस्था नाही. साफसफाईचे नियोजन पूर्णपणे बिघडलेले आहे.परिसरात कचरा व घाण साचल्यामुळे डासांची संख्या झपाट्याने वाढत आहे, ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका



निर्माण झाला आहे.त्यामुळे शिवसेना (उद्धव वाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मागणी करत आहोत की , सदर शौचालयाची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी.योग्य पद्धतीने पाणीपुरवठा व स्वच्छतेची व्यवस्था सुरू ठेवावी. डासांचे प्रमाण कमी करण्यासाठी तातडीने फवारणी व स्वच्छता मोहीम राबवावी. ही बाब तातडीने लक्षात घेऊन नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक ती कारवाई अशी मागणी उपशहर प्रमुख सचिन मनोहर त्रिमुखे यांनी निवेदना मार्फत केली आहे .

## संपादकीय

## हवेचा अंदाज कसा चुकतो?

आरक्षणासाठी पुन्हा एकदा रस्त्यावर उतरलेल्या मराठा समाजाचे वादळ काल मुंबईच्या दिशेने ड्रोपावले आहे. गेल्या वर्षी लोकसभा व विधानसभा निवडणुकीपूर्वी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्त्वात झालेले आंदोलन, त्याच्या राजकीय परिणामांविषयी झालेली चर्चा आणि अंतिमतः लोकसभा व विधानसभा निवडणुकीत आलेले परस्परविरोधी निकाल या पार्श्वभूमीवर जरांगे यांची ही नवी धडक काय वळण घेते, याकडे राज्याचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे. त्याचे कारण असे की, आधी विधानसभा निवडणुकीत मराठा समाज सर्वत्र आपले उमेदवार उतरवणार, असे जरांगे यांनी सांगितले आणि नंतर कोणत्याही एका समाजाच्या बळावर राजकीय यश मिळविणे अगदीच कठीण असल्याने हा विचार सोडून दिला. लोकांनी आपापल्या मर्जीने मतदान करावे, असे आवाहन केले. अर्थातच, लोकांनी तसे स्वमर्जीने मतदान केले. परिणामी, लोकसभेला मोठा धक्का सहन करावा लागलेला भारतीय जनता पक्ष आणि त्याच्या नेतृत्त्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला विधानसभा निवडणुकीत प्रचंड यश मिळाले. राजकीय जाणकार व विश्लेषकांनी लगेच मनोज जरांगे यांचा प्रभाव ओसरल्याचे अनुमान काढले. त्यांना मोडीत काढले. आता नव्याने राजधानी मुंबईला धडक देण्याची घोषणा जरांगे यांनी केली तेव्हा तेच अनुमान नजरेसमोर ठेवून पुन्हा त्यांना अशा आंदोलनासाठी जनसमर्थन मिळणार नाही, असाच सगळ्यांचा अंदाज होता. प्रत्यक्षात, जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून आंदोलक मुंबईकडे निघाले तेव्हा सगळ्यांचे अंदाज फसले. सामान्य जनता, विशेषतः आरक्षणाचा लाभार्थी ठरू शकणारा तरुण वर्ग प्रचंड मोठ्या संख्येने जरांगे यांच्या पाठीशी उभा असल्याचे सुरुवातीचे चित्र आहे. येत्या दोन-तीन दिवसांत हे आंदोलन कसे वळण घेते, त्याला प्रत्यक्ष किती यश मिळते, यावर त्या समर्थनाचे मूल्य निश्चित होईल. तोवर मान्यवर राजकीय जाणकारांनी वाट पाहिलेलीच बरी. या जाणकारांचे असेच अंदाज तिकडे बिहारमध्ये राहुल गांधी व तेजस्वी यादव या जोडगोळीनेही पार धुळीला मिळविले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्रीय निवडणूक आयोगाने बिहारमध्ये मतदारयाद्यांची स्पेशल इन्टेन्सिव्ह रिव्हिजन किंवा 'सर' नावाने विशेष पडताळणी मोहीम चालविली आहे. त्या मोहिमेतील गोंधळ, गडबडी चर्चेत असतानाच राहुल गांधी यांनी दिल्लीत कर्नाटकातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघातील यादीच्या निमित्ताने निवडणूक आयोग व भारतीय जनता पक्षावर तोफ डागली. मतचोरीचा गंभीर आरोप केला आणि असे जनमत चोरले जाऊ नये, यासाठी नंतर बिहारमध्ये मताधिकार यात्रा सुरू केली. मुख्य प्रवाहातील माध्यमांनी सत्ताधारी भाजपच्या इशाऱ्यावर राहुल गांधी यांची पप्पू प्रतिमा तयार केली असल्याने नाही म्हटले तरी त्याचा परिणाम या मताधिकार यात्रेच्या समर्थनावर होईल, अशा भ्रमात सगळे जण होते. प्रत्यक्षात त्या यात्रेला मिळणारे समर्थन केंद्र व त्या राज्यातील सत्ताधाऱ्यांना धडकी भरविणारे आहे. विशेषतः व्होटचोरीसंदर्भातील घोषणा लाखो लहान-थोरांच्या तोंडी आहेत. दोन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप व एनडीएला सहज यश मिळेल असे जे आधी वाटत होते, ते वातावरण बदलविण्याची ताकद या मताधिकार यात्रेत आहे, असे आता अनेक जण म्हणू लागले आहेत. थोडक्यात, जनतेच्या मनात नेमके काय आहे, हे हस्तीदंती मनोऱ्यात किंवा टीव्ही स्टुडिओमध्ये बसून कळत नाही, हे जुने मत पुन्हा अधोरेखित होऊ लागले आहे. यापासून काय धडा घ्यायचा तो संबंधित घेतीलच, तथापि, जनमानस, जनमत, लोकभावना सरळ रेषेत प्रवास करीत नाहीत, याची पुन्हा आठवण करून देण्याची आवश्यकता आहे. जरांगे, राहुल गांधी यांच्यासोबतच आणखी एक उदाहरण गरजेचे आहे. ते म्हणजे, उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांची दोन महिन्यांत तिसऱ्यांदा झालेली भेट. मराठी भाषेच्या मुद्दधावर ठाकरे ब्रँडचे हे दोन्ही कर्तेधर्ते जवळपास दोन दशकांचे वैमनस्य बाजूला ठेवून एकत्र आले. तेव्हापासून उद्धव सेना व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमधील राजकीय युतीची चर्चा सुरू आहे. ही युती झाली तर राज्याच्या राजकारणावर मोठे परिणाम होतील. त्याविषयी आडाखे बांधताना तरी प्रत्यक्ष लोकभावना काय असू शकतील, याचे तारतम्य बाळगले जाईल, अशी अपेक्षा बाळगूया.

## लहुजी शक्ती सेना आयोजित राज्यव्यापी मातंग समाज कार्यकर्ता संवाद मेळाव्यात महाराष्ट्र उपाध्यक्ष संतोष भाऊ आहिरे व नाशिक जिल्हाध्यक्ष किशोर भाऊ सकट यांच्या सह सर्व नाशिकचे कार्यकर्ते या ऐतिहासिक क्षणाचे साक्षी

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे**

लहुजी वास्तादांच्या प्रेरणेतून आणि समाजाच्या ऐक्याच्या बळावर घडलेला हा मेळावा मातंग समाजाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल.., मातंग समाजाच्या प्रश्नांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी, समाजाची ताकद शासनापुढे सशक्तपणे मांडण्यासाठी आणि भावी पिढ्यांना आत्मविश्वास देण्यासाठी हा मेळावा ठरला..,

या मेळाव्याला महाराष्ट्राचे मा. ना. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथराव शिंदे साहेब प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिले..,व्यासपीठावर संस्थापक अध्यक्ष मा. विष्णुभाऊ कसबे, प्रदेशाध्यक्ष मा. कैलासदादा खंदारे म.रा उपाध्यक्ष संतोष भाऊ आहिरे यांच्यासह राज्यभरातील कार्यकर्ते व मान्यवरांची भव्य उपस्थिती लाभली.

सभागृह इतके खचाखच भरले होते की बाहेर मंत्रालय परिसरातील रस्ते समाजाच्या उपस्थितीने गजबजले होते. ही गर्दी फक्त संख्येची नव्हती, तर समाजाच्या आत्मविश्वासाची, लढाऊ वृत्तीची आणि




ऐक्याच्या शक्तीची जिवंत ओळख होती..,संस्थापक अध्यक्ष मा. विष्णुभाऊ कसबे साहेब आणि प्रदेशाध्यक्ष मा. कैलासदादा खंदारे यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथराव शिंदे साहेब यांच्या कानावर पहिल्यांदाच एवढ्या व्यापक स्वरूपात समाजाच्या मागण्या पोहोचल्या त्यांच्या भाषणातील ठळक मुद्दे पुढील प्रमाणे :

**मातंग समाजाच्या इतिहासाची उज्ज्वल परंपरा अधोरेखित केली..,**

समाजाच्या प्रामाणिकपणाचे दर्शन घडवून, आरक्षणाची आणि इतर हक्काच्या मागण्यांची आवश्यकता स्पष्ट केली..,

मातंग समाजाने प्रामाणिकपणातून, परिश्रमातून आणि योगदानातून महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय वाटचालीत नेहमीच भक्कम भूमिका निभावली आहे, हे त्यांनी ठामपणे अधोरेखित केले..,

समाजाच्या हक्कांसाठी चाललेला संघर्ष ही केवळ लढाई नसून समाजाच्या अस्तित्वाची आणि सन्मानाची लढाई आहे, असे त्यांनी स्पष्ट केले..,

मातंग समाजाचे राजकीय पटलावरील योगदान ठळक केले

समाजातील कार्यकर्त्यांच्या योगदानाची प्रामाणिक दखल घेत समाजाच्या न्यायिक मागण्यांना व्यासपीठावरून परखडपणे मांडले..,

कार्यक्रमातील ठळक वैशिष्ट्ये :

समाजातील मान्यवरांना मा. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथराव शिंदे साहेबांच्या शुभहस्ते "समाजभूषण पुरस्कार – २०२५" प्रदान करण्यात आला.

लहुजी शक्ती सेनेकडून शिंदे साहेबांचा लहुजी वास्तादांच्या पराक्रम, शौर्य व प्रेरणेचे प्रतीक असलेला "दांडपट्टा" देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

सर्वसामान्य समाजबंधू-भगिनींकडून निवेदने घेण्यात आली. यावेळी शिंदे साहेबांनी समाजाच्या भावनांना प्रतिसाद देत ठाम आश्वासन दिले – "तुमच्या मागण्या मान्य करण्यात येतील."

हा विश्वासदायी शब्द म्हणजे फक्त राजकीय घोषणा नव्हे, तर मातंग समाजाच्या हृदयात नवा आत्मविश्वास निर्माण करणारा दीपस्तंभ ठरला..,

हा मेळावा म्हणजे
मातंग समाजाच्या आत्मसन्मानाचा नवा अध्याय,
हा मेळावा म्हणजे ?
समाजाच्या संघटित शक्तीचा ठोस पुरावा,
हा मेळावा म्हणजे ?
लहुजी शक्ती सेनेच्या नेतृत्वाने समाजाला दिलेल्या दिशेचे प्रखर दर्शन..,
मुंबईतून उमटलेला हा आवाज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात घुमतो आहे – "मातंग समाज जागा आहे, सज्ज आहे आणि हक्क मिळवण्यासाठी एकदिलाने लढायला तयार आहे."
हा मेळावा इतिहासात नोंदला जाईल –
हक्कासाठीच्या लढ्याचा,
ऐक्याच्या सामर्थ्याचा,
आणि मातंग समाजाच्या उज्ज्वल भविष्याच

## भाविकांच्या आरोग्यास बाधा पोहोचणार नाही याची खबरदारी घ्या

### सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोंतूला यांचे आवाहन

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**
**तालुका प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र माहूर गडावर पुढील महिन्यात साजरा होणाऱ्या नवरात्र उत्सव या महामहोत्सवासाठी सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीथ चंद्रा दोंतूला यांच्या अध्यक्षतेखाली दि 29 रोजी बैठक घेण्यात आली या बैठकीत नवरात्र उत्सव काळात येणाऱ्या भाविकांच्या आरोग्यालाबाधा पोहोचणार नाही याची खबरदारी घेण्याचे आवाहन उपस्थित सर्व विभाग प्रमुखांसह कर्मचाऱ्यांना सहाय्यक जिल्हाधिकारी जेनित चंद्रा दोंतूला यांनी केले या बैठकीत सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोंतूला यांचे सह तहसीलदार अभिजीत जगताप गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस पोलीस निरीक्षक गणेश कराड नगराध्यक्ष




फिरोज दोसानी नायब तहसीलदार कैलास जेठे नायब तहसीलदार श्रीमती अरुणा सूर्यवंशी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता डी के भिसे वैद्यकीय अधीक्षक डॉ किरण कुमार वाघमारे तालुका आरोग्य अधिकारी डॉ आर डी माचेवार मरविम कंपनीचे अभियंता आर बी शेंडे एसटी महामंडळाचे सी आर समर्थवाड माहूर न प चे कार्यालय अधीक्षक संदीप गजलवाड नको चे अभियंता गिरीश डूबेवार विस्तार अधिकारी रमेश गावंडे डॉ अभिजीत आंबेकर तलाठी चंद्रकांत बाबर महसूल सहाय्यक प्रभू गावंडे श्री रेणुका देवी संस्थानचे विश्वस्त संजय कान्नव क अभियंता पी व्ही हंचाटे व्यवस्थापक योगेश साबळे वन विभागाचे वनपाल मनोहर कत्तुलवार श्री दत्त शिखर संस्थांनचे लेखापाल प्रकाश गायकवाड यांचे सह देवस्थानचे प्रतिनिधी गडावरील व्यापारी पत्रकार पोलीस मान्यवर उपस्थित होते बैठकीत या नवरात्र महोत्सवात लाखो भावीक येणार असल्याने उपस्थित सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी दिलेली जबाबदारी पार पाडत भाविकांच्या आरोग्याला बाधा पोचणार नाही तसेच त्यांची सुरक्षा व्यवस्था महाप्रसाद तसेच एसटी महामंडळाने त्यांना गडावर पोहोचविण्याची जबाबदारी व्यवस्थित पार पाडत मरावीमने विद्युत पुरवठा खंडित होऊ देऊ नये तसेच सर्व विभाग प्रमुखांनी दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी अशा सूचना यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोंतुला यांनी दिल्या

## महात्मा फुले विद्यालय, सिंदखेड राजा च्या शिरपेचात मानाचा तुरा

### 14 वर्ष वयोगटातील कुस्ती स्पर्धेत ऋषी एखंडे जिल्हास्तरीय निवड झाल्याबद्दल डॉ कळकुंबे पाटील यांनी अभिनंदन केले

**सिंदखेडराजा प्रतिनिधी**
**उमेश एखंडे**




सिंदखेडराजा तालुक्यातील शेलू येथील ऋषीं गणेश एखंडे याने क्रीडा संकुलन येथे आयोजित जिल्हास्तरीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सर्व शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. विविध खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी आपली चमक दाखवली. मात्र कुस्तीच्या अखाड्ययात महात्मा फुले विद्यालय चा विद्यार्थी ऋषीं एखंडे याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. 14 वर्ष वयोगटातील कुस्तीमध्ये ऋषीं याने आपल्या चुरशीच्या खेळीवर भक्कम पकड ठेवत प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारली आणि बुलढाणा जिल्ह्यात क्रमांक पटकाविले. अतिशय हलाखीच्या व गरीब परिस्थितीत देखील ऋषीं आपल्या खेळाशी निष्ठा राखत कुस्तीची परंपरा जोपासली आहे. त्याच्या मेहनतीला आणि चिकाटीला आज यशाचे गोड फळ लाभले आहे. या यशामुळे रुम्हणा विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून शेलू गावकऱ्यांमध्ये, शिक्षकवर्गात व तालुक्यातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. ऋषीं च्या या विजयाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत असून पुढील राज्य व राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत देखील तो नावलौकिक मिळवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## शेतपिकांचे सर्वे करून नुकसान भरपाई द्या..शासन प्रशासनास बहुजन मुक्ती पार्टी ची मागणी

**महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे**

दारव्हा तालुक्यात दिनांक 28/8/2025 रोजी दुपारी तीन ते पाच च्या दरम्यान दारव्हा तालुक्यात अनेक गावातील शेतकऱ्यांचे ढगफुटी सदृश पावसामुळे शेत पिकांचे नुकसान झाले.डोंगरीनदीच्या पाण्यामुळे संजय ठाकरे अंतरगाव यांच्या शेतातून पाईप वाहून गेले.तर देविदास राठोड भांडेगाव या शेतकऱ्याच्या शेळ्या व बैल थोडक्यात बचावले.तर आशिफ खा पठाण व अय्युब खा सिकंदरखा पठाण माहुली व ईतर यांच्या शेत सर्व्हे नंबर 122/123/124/126/136/137या शेताला लागून असलेल्या लेआउट व नाल्यामुळे सदरील शेतात पाणी शिरल्याने शेतकऱ्याच्या सतरा ते अठरा एकर शेतातील कपाशी व सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.मानकी,शेंद्री, डोल्हारी, अंतरगाव, भांडेगाव, माहुली या गावासह दारव्हा तालुक्यातील विविध गावामधील शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून त्यांचे त्वरित सर्वे करून नुकसान भरपाई देण्यात यावी.असे जिल्हाअधिकारी यवतमाळ व तहसीलदार दारव्हा यांना बहुजन मुक्ती पार्टी च्या वतीने बिमोद मुधाने बहुजन मुक्ती पार्टी अध्यक्ष लोकसभा यवतमाळ /वाशीम तथा प्रभारी दारव्हा दिग्रस नेर विधानसभा मतदारसंघ यांनी अशी मागणी केली आहे..





## पंधरा मिनटाच्या पावसाने नगर प्रशासनाचे पितळ उघडे. मान्सून पूर्व तैयारी कागदावर प्रत्यक्षात काम शून्य..

**कारंजा प्रतिनिधी** / येथील खालच्या भागात राहणाऱ्या जनतेचे पावसाळ्यात होतात हाल मागील 30 वर्षों पासून माळीपुरा, डाफ़नी पूरा, बकरा कमेला, दिल्ली वेस,निज़ाम पूरा,महात्मा फुले चौक, जूना सरकारी दवाखाना, व अन्य खालच्या भागात 15 मिनट आलेल्या पावसात नावापुरते स्वच्छ केलेल्या नाल्या तुडूंब भारतात व नाल्या मधली घाण रोड़ वरुण वाहते आणि परिसरात राहणाऱ्या नागरिकांचा आरोग्यास घातक ठरते, या परिसरात, 6,ते 7 शाळा आहेत लहान लहान मुले शाळेत जातात पाउस आला की शाळेतले मुलांचे सुध्दा हाल होतात, मॉनसून पूर्व तैयारी फ़क़्त कागदावर आहेत शहरात घंटा गाड़ी सुध्दा 3 ते 4 दिवसाच्या आड़ येतात महात्मा फुले चौक ते दारव्हा नाका पर्यन्त रस्ता खूब ख़राब झालेला आहेत हा मार्गा गुरु मंदिर, जैन मंदिर ,जे डी चवरे ,जे सी चवरे ,शाळाना जोडलेला आहेत नगर परिषद प्रशासनाला किती वेळा निवेदन दिला तरी हा रस्ता बनला नाहीत,शहराच्या मुख्य मार्ग आहेत या मार्गाने 10 ते 11 गणेश,मंडल सुध्दा विसर्जनाला या मार्गाने जातात वर्षणोवर्ष पासून त्रासलेल्या नागरिकाची अपेक्षा नवीन आलेल्या जिल्हाधिकारी व नवीन आलेल्या मुख्य अधिकारी यांचा कड़े लागल्या आहेत...



## गणेशोत्सवापूर्वी भंडारा जिल्ह्यात १२ सराईत गुन्हेगार ६ महिन्यांसाठी तडीपार!

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

**भंडारा, :-** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भंडारा जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कडक पाऊल उचलले आहे. शरीराविरुद्ध गुन्हे, अवैध रेती तस्करी आणि अवैध दारू विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या १२ सराईत गुन्हेगारांना भंडारा जिल्ह्यातून ६ महिन्यांसाठी तडीपार करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक नूरूल हसन यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई करण्यात आली. तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांमध्ये पोलीस स्टेशन कारधा येथील मयुर चंद्रशेखर मते (वय २२, रा. मानेगाव), पवनी येथील शुभम राजेंद्र जिभकाटे (वय २५, रा. वलनी) आणि निखील प्रभाकर तिधरे (वय २७, रा. वलनी) यांचा समावेश आहे. हे




तिघे शरीराविरुद्ध गुन्हे आणि अवैध रेती तस्करीमध्ये सामील होते. जवाहरनगर पोलीस स्टेशन अभिलेखावरील अवैध दारू विक्रीचा व्यवसाय करणारे श्रीकांत हरिचंद मेश्राम (वय ४६, रा. खैरी/सालेबर्डी), अभिमन्यु निलकंठ उके (वय ४२, रा. लोहारा) आणि प्रशांत संतोष कांबळे (वय ४९, रा. सावरी) यांनाही तडीपार करण्यात आले आहे. अड्याळ पोलीस स्टेशन येथील शरीराविरुद्ध गुन्हे करणारा संतोष लेहनदास लोणारे (वय ३८, रा. नवेगाव ठाणे) यालाही जिल्ह्यातून बाहेर काढण्यात आले आहे. याशिवाय, भंडारा पोलीस स्टेशन अभिलेखावरील अवैध दारू विक्रीचा व्यवसाय करणारे अशोक सुर्यभान खोब्रागडे (वय ५०, रा. आंबेडकर वार्ड गणेशपुर) आणि विरेंद्र बाबुराव चकोले (वय ४२, रा. शिवाजी वार्ड शुक्रवारी), तसेच शरीराविरुद्ध गुन्हे करणारे हर्षल उर्फ हर्षपाल संजय पाउलझाडे (वय २३, रा. भगतसिंग वार्ड), अभिषेक उर्फ पांग्या रामभाउ चंदनबटवे (वय २७, रा. नेहरू वार्ड) आणि बाबु उर्फ संकेत सार्वे (वय ३३, रा. राणी लक्ष्मीबाई वार्ड) यांचाही तडीपार करण्यात आलेल्यांमध्ये समावेश आहे. संबंधित ठाणेप्रभारी अधिकाऱ्यांनी या गुन्हेगारांचे गुन्हेगारी अभिलेख तयार करून, पोलीस अधीक्षक नूरूल हसन यांच्या मार्गदर्शनाखाली तडीपार प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकारी, भंडारा यांच्या कार्यालयात सादर केला. उपविभागीय दंडाधिकारी, भंडारा यांनी कायद्याच्या कसोटीवर या गुन्हेगारांची गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी आणि जिल्ह्यातील गणेशोत्सव तसेच आगामी सण-उत्सव शांततेत पार पडावेत यासाठी वरील नमूद गुन्हेगारांना भंडारा जिल्ह्यातून ६ महिन्यांसाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. पोलीस अधीक्षक नूरूल हसन, अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (स्थागुशा) नितीनकुमार चिंचोळकर आणि भंडारा, कारधा, पवनी, जवाहरनगर, अड्याळ पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार राजेश पंचबुधे आणि पोलीस नाईक अंकोश पुराम यांनी ही यशस्वी कारवाई केली.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)
१ २ ३ ४ ५ ६

दैनिक
# महाराष्ट्र जीत
शनिवार दि. ३० ऑगस्ट २०२५
वाशीम जिल्हा


## वाढती रुग्ण संख्या लक्षात घेता काजळेश्वर येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची मागणी .

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाडः**

कारंजा तालुक्यातील ग्राम काजळेश्वर येथे दवाखान्यात होत असलेली वाढती रुग्ण संख्या लक्षात घेता काजळेश्वर गावला प्राथमीक आरोग्य केंद्र शासनाने मंजूर करावे व काजळेश्वर तथा लगतच्या गाव वासीयांना आरोग्य सेवा पुरवावी अशी मागणी काजळेश्वरचे सरपंच नितीन पाटील उपाध्ये यांनी केली आहे . वृत्त असेकी काजळेश्वर येथे जी.प . आयुर्वेदीक दवाखाना गत अनेक वर्षा पासून आहे तेथे आयुर्वेदीक वैद्य म्हणून डॉ प्रशांत वाघमारे कार्यरत आहे . वाढती रुग्ण संख्या दवाखान्यात होत असल्याने तथा गावालगत जानोरी विराहीत पानगव्हान उकर्डा; पारवा पलाना खांदला धानोरा पाटेकर इत्यादी गावचे रुग्ण काजळेश्वर येथील दवाखान्यात येत असल्याने ओपडी लक्षात घेता काजळेश्वर येथे प्राथमिक केंद्राची गरज जानवत आहे . किमान २५ खाटाचे ॲलोपॅथी हॉस्पीटल व्हावे त्यामुळे ग्रामस्थ तथा लगतच्या गावातील रुग्णांना औषधोपचार मिळू शकेल . तेव्हा सर्व सामान्यांना औषधोपचार; तथा ॲडमीट व्यवस्था असावी ज्या मुळे रुग्णाना आरोग्य सेवा तत्परतेने मिळेल . गावची लोकसंख्या ;लगतच्या गावची रुग्ण संख्या लक्षात घेता शासनाने जनसामान्याना आरोग्य सेवेचा लाभ मिळवा करीता ग्रामस्थांचे गरजेसाठी काजळेश्वर येथे प्राथमीक आरोग्य केंद्र मंजूर करावे अशी मागणी सरपंच नितीन पाटील उपाध्ये यांनी शासनाकडे केली आहे .



## आदर्श गणपती सोसायटी उत्सव स्पर्धा

**पुणे प्रतिनिधी श्याम जगताप**



रोटरी ही आंतरराष्ट्रीय समाजभिमुख संस्था आहे. समाजाला उपयुक्त कार्य करणे हा तिचा गाभा आहे. रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रज ही स्पर्धा गेले तेवीस वर्ष आयोजित करत आहे. रोटरी क्लब ऑफ पुणे व रोटरी क्लब कात्रज चे अध्यक्ष अजय काळे सर यांच्या मार्गदर्शनाने पर्वती ते कात्रज भागातील आदर्श गणपती सोसायटी स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यामध्ये गणेश मंडळाकडून वर्षभर करण्यात येणारे सामाजिक उपक्रम, योग्य सजावट, सर्व सोसायटीतील सभासदांना सामावून घेऊन करण्यात येणारे विविध कार्यक्रम, स्पर्धा याच्या संदर्भात माहिती घेऊन, त्याची पाहणी करून त्यांना पारितोषिक व पुरस्कार वितरण करण्यात येते . ज्या सोसायटी गणेश मंडळांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून तसेच रोटरीच्या निकषानुसार गणेशोत्सव साजरा करीत आहेत, अशा गणेश मंडळांना पारितोषिक देण्यात येणार आहे . 14 सप्टेंबर, रविवार संध्याकाळी सात वाजता. बालगंधर्व, कलादालन येथे "व्यक्तिगत हितापेक्षा उच्च सेवा" हे रोटरीचे ब्रीद आपण प्रत्यक्ष आचरणात आणत आहात , याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

## भिवंडी मध्ये ढोल ताशांच्या गजरात गुलाल उधळत,

### दीड दिवसांच्या बापाला भक्तीभावाने भक्तांचा निरोप एकूण ३७४४ गणेशमूर्तींचे विसर्जन

महाराष्ट्र जीत

**भिवंडी सुनील झळके**

वर्षभराच्या प्रतीक्षेनंतर, खड्ड्यांच्या रस्त्यांच्या अडथळ्यातून व वाहतुकीच्या समस्यातून, ढोल ताशांच्या गजरामध्ये वाजत गाजत अगदी भक्तीभावाने विराजमान झालेल्या गणपती बाप्पाला भिवंडीमध्ये अत्यंत थाटामाटात गुलाल उधळत," गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या" अशा जयघोषांमध्ये गणेश भक्तांनी दीड दिवसाच्या बाप्पाला उत्साहपूर्ण परंतु,जड अंतकरणाने निरोप दिला. त्यामध्ये संपूर्ण शहरातील घरगुती ३७४४ गणेशमूर्तींचे विविध गणेश विसर्जन स्थळांवर विसर्जन करण्यात आले.


भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील शेलार येथील गणेश घाट टिळक घाट वराळदेवी तलाव पुणे कामगार घाट नारकोली तलाव इत्यादी विविध विसर्जन घाटांवर महापालिकेने स्वागत कक्ष व सुरक्षा कक्ष स्थापन करून नागरिकांना सुरक्षिततेच्या सूचना देण्याची व्यवस्था केली होती. प्रत्येक विसर्जन स्थळी मंगल कलश विसर्जना करतात तराफे स्पीड बोट वैद्यकीय आरोग्य व्यवस्था जीव रक्षक, नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच अग्निशमन दल नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तैनात करण्यात आले होते. मंगल कलश यामध्ये येणाऱ्या फुलांचे संकलन करून त्याचे खत निर्मितीसाठी व्यवस्था व प्लास्टिक संकलन यांचे व्यवस्था करण्यात आली महापालिकेने घंटागाड्यांची व्यवस्था ठेवली होती.दीड दिवसांच्या गणेश विसर्जनासाठी भिवंडीतील प्रमुख रस्ते व नाक्या नात्यांवर कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी कडक पोलीस बंदोबस्त साईनाथ करण्यात आला होता. त्यामुळे भिवंडीमध्ये दीड दिवसांचा विसर्जन सोहळा अत्यंत शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणामध्ये शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

## नांदेड जिल्ह्यातील पूर परिस्थिती नियंत्रणात प्रशासनाच्यावतीने योग्य ती खबरदारी घेवून बचावकार्य सुरु जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने**

नांदेड जिल्ह्यामध्ये बुधवार पासुन सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील सर्व नदी, नाल्यांना पूर आला आहे. तसेच नांदेड शहरात काल रात्रीपासून झालेल्या पावसामुळे शहरातील अनेक सखल भागात पाणी शिरले आहे. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दल, एसडीआरएफ, सीआरपीएफ, नांदेड मनपा व स्थानिक शोध व बचाव पथकाच्या माध्यमातून शोध व बचाव कार्य युध्द पातळीवर सुरु आहे. पूर परिस्थिती नियंत्रणात आहे.




प्रशासनकडून योग्य ती खबरदारी घेतली जात असून सर्व यंत्रणासोबत संपर्क व समन्वय ठेवून जिल्हा प्रशासनाची कार्यवाही सुरु आहे. या परिस्थितीत नागरिकांनी अति आवश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

नांदेड येथील पुरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील भारतीय सैन्य दलाच्या बटालीयनला बोलाविले आहे. तात्पुरते स्थलांतरीत नागरिकांना आवश्यक ती मदत करण्यात येत असून, कालपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे आज शुक्रवार २९ ऑगस्ट रोजी सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यातील एकूण ९३ मंडळापैकी ६९ मंडळात अतिवृष्टी झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद कंधार मंडळ व माळाकोळी मंडळ (लोहा) मध्ये प्रत्येकी २८४.५० मि.मि. नोंदविली आहे.

तालुकानिहाय अतिवृष्टी झालेली मंडळे- नांदेड ०७, बिलोली-०६,मुखेड-०८, कंधार -०७, लोहा-०६, हदगांव-०५, भोकर-०४, देगलूर-०५, किनवट-०१, मुदखेड-०३, हिमायतनगर-०१, धर्माबाद-०४, उमरी-०४, अर्धापूर-०३, नायगांव-०५ मंडळात अतिवृष्टी नोंद झाली आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्याच्या पर्जन्यमान हे ६५.०० मि.मि. पेक्षा जास्त असून, त्यापैकी ११ तालुक्याचे पर्जन्यमान हे १००,०० मि.मि. पेक्षा जास्त आहे. जिल्ह्यातील गोदावरी, मानार, मांजरा, लेंडी, या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाल्यामुळे या नद्या दुथडी भरुन वाहत आहेत. तेलंगाना राज्यात मुसळधार पाऊस सुरु असून पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी निजामसागर, पोचमपाड या धरणातील बॅक वॉटर व विसर्गामुळे बिलोली, देगलूर, धर्माबाद व मुखेड तालुक्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. आतापर्यंत एकूण ५ हजारहून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. एसडीआरएफ, सीआरपीएफ, स्थानिक पोलीस व स्थानिक प्रशासनाच्या मदतीने आपत्तीग्रस्त लोकांना हलविण्यात आले आहे. सद्यस्थितीत परिस्थिती नियंत्रणात आहे.

## भंडारा खांब तलावाच्या सौंदर्यीकरणातील गैरव्यवहार चव्हाट्यावरः शिवसेनेचे "भ्रष्टाचार पे चर्चा" आंदोलन.

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

महाराष्ट्र जीत

**भंडारा :-** ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व असलेल्या भंडारा शहरातील प्राचीन खांब तलावाच्या सौंदर्यीकरणाचे काम मागील चार वर्षांपासून राज्य शासनाच्या नगर विकास खात्यामार्फत वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून सुरू आहे. मात्र, या ४० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील कामांचा दर्जा अत्यंत सुमार असून, मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने केला आहे. कामातील गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई व्हावी या मागणीसाठी शिवसेनेने शहरात "भ्रष्टाचार पे चर्चा" हे अभिनव आंदोलन सुरू केले आहे. सौंदर्यकरणादरम्यान रिटेनिंग




वॉलचे (संधारक भिंत) ५० फूट लांबीचे बांधकाम कोसळले असून, आणखी मोठ्या भागाची भिंत झुकलेली आणि पडण्याच्या मार्गावर आहे. यासंदर्भात २८ जुलै २०२५ रोजी मुख्यमंत्री आणि नगर विकास मंत्र्यांना तक्रार देण्यात आली होती, परंतु कोणतीही कार्यवाही झालेली नाही. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख संजय रेहपाडे यांचा आरोप आहे की, "चोर चोर मावस भाऊ, सारे मिळून आपण महाराष्ट्राला खाऊ" या धर्तीवर सध्याचे राज्य सरकार काम करत आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे ४० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, आतापर्यंत ७०% खर्च झाल्याचे समजते. मात्र, कामाची माहिती, कंत्राटदाराचे नाव किंवा खर्चाचा तपशील दर्शविणारा एकही फलक लावण्यात आलेला नाही. अननुभवी कंत्राटदारांना राजकीय आशीर्वादाने कामे मिळत असून, टक्केवारीच्या धोरणामुळे बोगस बिलांद्वारे कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप संजय रेहपाडे यांनी केला आहे. या भ्रष्टाचाराविरोधात जनजागृती करण्यासाठी शिवसेनेने भंडारा शहरातील चौकाचौकात बॅनर लावून "भ्रष्टाचार पे चर्चा" आंदोलन सुरू केले आहे. यामुळे नागरिकांमध्ये या भ्रष्टाचाराची खमंग चर्चा सुरू झाली आहे.

## भिवंडी महानगरपालिकेमध्ये ८ सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांना निरोप.

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके)**

महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानाप्रमाणे ०८ कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा.प्र.से.) यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचा-यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोप देणेत आला. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त (आरोग्य) शैलेश दोंदे यांच्या शुभहस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यांत आला आणि त्यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छाही दिल्या.



महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या तिस-या मजल्यावरी आयुक्त यांच्या सभागृहात संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमातून बाळाराम जाधव (सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्रमांक ५-सेवानिवृत्त), महेंद्र सुकीर गायकवाड( लिपिक -सेवानिवृत्त), सोहेल अह. मोह. युसुफ मोमीन ( इलेक्ट्रिशियन - सेवानिवृत्त), राधिका कृष्णा शेलार (वॉचमन-सेवानिवृत्त), सिद्धू लक्ष्मण चव्हाण (सफाई कामगार-सेवानिवृत्त), संजय लक्ष्मण वाघचौर (सफाई कामगार-सेवानिवृत्त), बबन शंकर वाणी(सफाई कामगार- सेवानिवृत्त), शोभा दशरथ जाधव (सफाई कामगार) अशा ०८ सेवानिवृत्त मनपा कर्मचा-यांना महानगरपालिकेच्यावतीने आज निरोप देण्यांत आला. या प्रसंगी मनपा अधिकारी व कर्मचारी, सर्व कर्मचारी संघटना प्रतिनिधी, सेवानिवृत्त कर्मचा-यांचे कुटुंबातील सदस्य इ. उपस्थित होते.

## शंकरपूरच्या चिमुकल्यांनी हातखर्चातून आणले 'बाप्पा'.

### रणरागिणीचे मार्गदर्शन, माजी वनरक्षकांच्या हस्ते स्थापना.

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

**साकोली :-** गणेश चतुर्थीच्या मंगलमय पर्वावर साकोली तालुक्यातील शंकरपूर/वडेगाव येथील चार चिमुकल्यांनी एक अनोखा आदर्श घालून दिला आहे. खेतानसिंग मडावी (१४), दक्ष शेंदरे (१३), पुनित वाढवे (११) आणि गौरव साखरे (११) या मुलांनी आपल्या आई-वडिलांनी खाऊ आणि किरकोळ खर्चासाठी दिलेल्या पैशांची बचत करून स्वतःच्या हातखर्चातून गणपती बाप्पांची मूर्ती आणली आहे. बाप्पांवरील त्यांची ही श्रद्धा आणि ओढ पाहून ग्रामस्थांनी त्यांच्यासाठी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन केले. या मूर्तीची स्थापना क्रांतीसूर्य वीर बिरसा मुंडा सन्मान चिन्हाने सन्मानित शेजल सयाम यांच्या मार्गदर्शनाखाली, तर माजी वनरक्षक माणिकराम टेकाम आणि उमराव मडावी यांच्या हस्ते करण्यात आली. यावर्षी शंकरपूर गावात सार्वजनिक गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले नव्हते. अशा परिस्थितीत या चिमुकल्यांनी आपली परंपरा जपून दाखवलेली ही उत्कृष्ट कामगिरी सर्वत्र कौतुकाचा विषय ठरली आहे. दि. २७ ऑगस्ट, बुधवार रोजी माजी वनरक्षक माणिकराम टेकाम आणि माजी वनरक्षक उमराव मडावी यांच्या हस्ते आणि असंख्य ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. चिमुकल्यांच्या या प्रयत्नांमुळे गावात एक वेगळाच उत्साह संचारला आहे.




## पलाडी ग्रामपंचायतीचा 'स्मार्ट' निर्णयः रिचार्ज मीटरला जोरदार 'करंट'!

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा**

**भंडाराः** जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी निवडून दिलेले प्रतिनिधीच जर जनतेला नव्या समस्यांमध्ये ढकलत असतील, तर जनसामान्यांनी न्याय कोणाकडे मागावा, असा सवाल भंडारा जिल्ह्यातील पलाडी ग्रामपंचायतीतील जनतेने उपस्थित केला आहे. 'स्मार्ट' (रिचार्ज, प्रीपेड, डिजिटल) मीटरच्या सक्तीच्या स्थापनेविरोधात पलाडी ग्रामपंचायतीने एकजुटीने ठराव मंजूर करत या कृतीला जोरदार विरोध दर्शवला आहे. ग्रामस्थांच्या मागणीशिवाय, तसेच त्यांना विश्वासात न घेता आणि आर्थिक बाबींचा विचार न करता, 'अक्कल के अंधे' प्रशासकीय अधिकारी व काही लोकप्रतिनिधी यांनी युद्धपातळीवर स्मार्ट मीटर लावण्याचे काम सुरू केले आहे, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. "जनता ज्या जीवनावश्यक बाबींची मागणी करत आहे, त्या पुरवल्या जात नाहीत, उलट जनविरोधी कायदे संसदेत पास केले जातात," अशी खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली. ग्रामस्थांनी



असेही अधोरेखित केले की, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधानपरिषद यांच्यापेक्षा ग्रामसभा जास्त शक्तिशाली आहे. कायद्याचे योग्य ज्ञान नसलेल्या लोकप्रतिनिधींकडून जनतेच्या अपेक्षा पूर्ण होणे कठीण आहे. या पार्श्वभूमीवर, स्मार्ट मीटरच्या संभाव्य आर्थिक धोक्यातून जनतेला वाचवण्यासाठी पलाडी ग्रामपंचायतीने 'स्मार्ट' मीटर विरोधात ग्रामसभेत ठराव घेण्याचे निवेदन दिले होते. जननायक अभय डी. रंगारी यांच्या कुशल नेतृत्वाखाली सुरू झालेल्या जनआंदोलनाचा एक भाग म्हणून, पलाडी गावातील लोकांनीही स्मार्ट मीटर विरोधात पुराव्यानिशी निवेदन सादर केले. सर्वानुमते घेतलेल्या ठरावानुसार, स्मार्ट मीटर लावणे बंधनकारक नाही, असे न्यायालयानेही स्पष्ट केले आहे. त्यामुळे, न्यायालयाच्या निर्णयाविरोधात जाऊन जो कोणी जबरदस्ती करेल, त्याच्याविरोधात जनआंदोलन छेडले जाईल, असे ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे. बळजबरी करणाऱ्यांवर तात्काळ वॉरंट निघावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. aशेवटी, अभय डी. रंगारी यांच्या फिल्मी स्टाईल वक्तव्याचे जनतेने समर्थन करत, शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी, वीज वितरण कंपनी आणि संबंधित विभागाला संदेश दिलाः "देश, संविधान, लोकतंत्र, वोट का अधिकार बचाने के लिए जरूरत के समय हिंसा का सहारा लेना दुनियामें क्रांति कहलाती है।" यावरून, स्मार्ट मीटर विरोधात पलाडी येथील जनतेचा लढा अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## कलावंतांच्या हक्कासाठी एकत्रित पाऊल नानाभाऊ पंचबुध्दे यांची मदतीची ग्वाही.

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

**भंडारा,** – प्रतिष्ठित कलावंत प्रतिष्ठानच्या जिल्हा कार्यकारिणी मेळाव्याचे आयोजन प्रगती महिला महाविद्यालय, भंडारा येथे गुरुवारी उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील कलावंतांच्या समस्या आणि त्यांच्या सशक्तीकरणावर सखोल चर्चा झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्यारेलाल उच्चीबगले होते, तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नानाभाऊ पंचबुध्दे उपस्थित होते. याशिवाय विदर्भ प्रदेश अध्यक्ष महेंद्र वाहाणे, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत देशकर, सामाजिक कार्यकर्ते अमृत बन्सोड, महादेवजी मेश्राम, महिला अध्यक्षा सरिताताई मदनकर, शहर अध्यक्ष हेमंत महाकाळकर, शाहिर सवितराव गजभिये आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, राजश्री शाहू महाराज, जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन



करून करण्यात आली. नानाभाऊ पंचबुध्दे यांचा शाल-श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. महेंद्र वाहाणे यांनी आपल्या प्रस्तावनेत सांगितले की, स्वातंत्र्यपूर्व काळात कलाकारांनी जनजागृती करून समाजात क्रांती घडवली. मात्र आजही अनेक कलाकार आर्थिक व सामाजिक अडचणीत आहेत. शासनाने त्यांच्या कल्याणासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली. नानाभाऊ पंचबुध्दे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "ग्रामिण भागातील भारुड, दंडार, भजन, कीर्तन करणारे कलाकार समाजप्रबोधनाचे कार्य करत आहेत. त्यांच्या समस्या शासन दरबारी मांडून मी मदतीचा पूर्ण प्रयत्न करणार आहे," अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमात सरिताताई मदनकर यांनी कलेच्या विविध पैलूंवर भाष्य करत एक सुंदर कविता सादर केली. सर्व मान्यवरांनी कलाकारांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे संचालन महेंद्र वाहाणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनिता आगलावे यांनी केले. जिल्हा संघटक राजविलास बोरकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मोलाचे योगदान दिले. या मेळाव्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील कलाकारांच्या समस्या ऐकून त्यावर उपाययोजना करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. सामाजिक परिवर्तनात कलाकारांची भूमिका महत्त्वाची असून त्यांना योग्य मदत मिळावी, हीच या कार्यक्रमाची प्रमुख भावना होती.

## गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर भंडारा पोलिसांचा शहरात रूट मार्चः शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन.

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

भंडाराः आगामी गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे सण शांततेत आणि सुरक्षित वातावरणात साजरे व्हावेत या उद्देशाने भंडारा पोलिसांनी शहरात रूट मार्च काढला. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलाची सज्जता आणि तयारी दर्शवणे हा या रूट मार्चचा मुख्य हेतू होता, ज्यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली. आज दुपारी १२:३० वाजता पोलीस स्टेशन, भंडारा येथून या रूट मार्चला सुरुवात झाली. हा मार्च शहरातील महत्त्वाच्या मार्गांवरून फिरला. यामध्ये जलाराम चौक, हेडगेवार चौक, बजरंग चौक, नूरी मज्जिदसमोरून, अण्णाभाऊ साठे चौक, मिस्कीन टॅक, मुस्लिम लायब्ररी चौक, संविधान चौक, तुकडोजी पुतळा आणि गाधी चौकातून पुन्हा पोलीस स्टेशनमध्ये परत येऊन दुपारी १.३० वाजता समाप्त झाला. या रूट मार्चमध्ये अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी





प्रशांत कुलकर्णी आणि पोलीस निरीक्षक बोरकर यांच्यासह एकूण ७ पोलीस अधिकारी, ३५ पोलीस अंमलदार, ३५ सैनिक सहभागी झाले होते. तसेच, जवाहरनगर, मोहाडी आणि कारधा पोलीस स्टेशनमधील अंमलदारही उपस्थित होते. विशेष म्हणजे, आर.सी.पी. पथक, गॅस गन आणि रायफल्ससह पोलीस दल पूर्णपणे सज्ज होते, ज्यामुळे पोलीस दलाची ताकद आणि तत्परता दिसून आली. या रूट मार्चमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, पोलिसांनी सर्व जनतेला शांतता आणि सलोखा राखण्याचे आवाहन केले आहे. तसेच, कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याची विनंतीही करण्यात आली आहे, जेणेकरून संभाव्य अनुचित घटना टाळता येतील